दैनिक अन्यायाचा प्रतिकार, महाराष्ट्राचा बुलंद आवाज
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनील कृष्णाजी पोतदार
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक १९९ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● बुधवार दि.१९ ऑक्टोबर २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पंतप्रधान आवास योजनेचे काम महाविकास आघाडीने पाडले बंद



**दै.रायगड नगरी । पनवेल**

**एल अँड टी मार्फत पनवेल तालुक्यातील नावडे येथे पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत काम सुरु करण्यात येणार होते. त्यामुळे रस्त्याच्या दुतर्फा असलेली बांधकामे पाडण्यासाठी आज सिडकोचे अतिक्रमण पथक या ठिकाणी आले असता प्रथम आम्हाला पर्यायी जागा द्या व मगच हि बांधकामे पाडा असा इशारा देत महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी हे काम तात्पुरते बंद पाडले.**

आमदार बाळाराम पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडीचे नेते बबनदादा पाटील, सुदाम पाटील, मा.नगरसेवक अरविंद म्हात्रे, मा.नगरसेवक रवींद्र भगत, किरण दाभणे, फारुख पटेल आदींसह मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते. नावडे गाव परिसरात १९७० पासून रस्त्याच्या दुतर्फा बांधकामे करण्यात आली आहे. सिडको या परिसरात पंतप्रधान आवास योजना विकसित करीत आहे परंतु येथील स्थानिक भूमिपुत्रांचे प्रश्न अजून सोडवले गेलेले नाहीत. त्यामध्ये प्रामुख्याने नावडे ग्रामस्थांचे साडेबारा टक्के प्लॉटचा प्रश्न असून तो सिडकोने अलॉट करावा त्याचप्रमाणे रस्त्याच्या दुतर्फा बांधण्यात आलेली घरे, गाळे, दुकाने ती न तोडता प्रथम पर्याय जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सिडको प्रशासनाकडे वारंवार करून सुद्धा या मागणीकडे दुर्लक्ष करून येथील भूमिपुत्रांना बेघर करण्याचा प्रयत्न सिडको करत आहे व याला विरोध म्हणून आज सिडकोचे अतिक्रमण विभागाचे पथक हि बांधकामे तोडण्यासाठी आले असता त्याला महाविकास आघाडीच्या नेत्यांसह स्थानिक ग्रामस्थांनी तीव्र विरोध करून त्यांना हि कारवाई करून दिली नाही.

> भूमिपुत्रांना रस्त्यावर आणण्याचे काम शिंदे सरकार करत असून, ठाकरे सरकार सत्तेवर असताना भूमिपुत्रांना न्याय मिळवून देण्याचा काम आम्ही केले होते. सिडकोचे अतिक्रमण पथक या ठिकाणी पुन्हा आले तर आम्ही बुलडोझरच्या सामोरे जाऊ
> **बबन पाटील (नेते, महाविकास आघाडी)**

> भाजप प्रणित सरकार हे फक्त गोर-गरिबांचे घरे व मंदिरे पाडण्याचे काम करत आहे. बाहेरून येणाऱ्या लोकांना राहण्यासाठी शासनामार्फत घरे देण्यात येणार आहे. मात्र येथील स्थानिक गोर गरिबांच्या घरावर सिडको बुलडोझर चालवतोय.
> **सुदाम पाटील (नेते, महाविकास आघाडी)**

> स्थानिक भूमीपुत्राचा प्रश्न हा प्रलंबित असल्याने तो पहिला निकाली काढावा व त्यानंतरच सिडकोने अतिक्रमण मोहीम राबवावी.
> **– आ.बाळाराम पाटील**

# शिक्षक आमदारांच्या आंदोलनाची यशस्वी सांगता

**शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी बहुतांश मागण्या पूर्ण करण्याचे दिले आश्वासन**



**दै.रायगड नगरी । मुंबई**

गेले २ दिवस विधान भवन परिसरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ आमदार बाळाराम पाटील,आमदार सुधीर तांबे, आमदार अभिजित वंजारी, आमदार विक्रम काळे, आमदार जयंत आसगावकर, आमदार किशोर दराडे, आ. किरण सरनाईक, आमदार राजेश राठोड यांच्यासह विधिमंडळाच्या प्रांगणात धरणे आंदोलन करत होते. मुंबईतील आझाद मैदानावर सुरु असलेले विविध शिक्षक संस्थांच्या आंदोलनाची तसेच या आंदोलनाची दखल घेत राज्याचे माननीय शिक्षणमंत्री ना. दिपकजी केसरकर यांनी आमदार महोदयांसोबत बैठक घेऊन प्रदीर्घ चर्चा करत सर्व मागण्या समजून घेतल्या.

कालच शिक्षण सचिव व शिक्षण अधिकार्यांनी शिक्षणमंत्र्यांचे पत्र आमदार महोदयांना दिले. पण त्यावर न थांबता शिक्षणमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा करण्याचा आग्रह यावेळी सर्व आमदार महोदयांनी धरला. आज दिनांक १८ ऑक्टोबर रोजी सकाळी हा आग्रह पूर्ण झाला. यावेळी सन २०१२-१३ च्या नैसर्गिक वाढीच्या वर्ग, तुकड्यांना शंभर टक्के अनुदान लागू करण, अघोषित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना निधीसहीत घोषित करणे, अंशतः अनुदानित शाळांना शंभर टक्के अनुदान लागू करणे, घोषित त्रुटी पात्र शाळेचा शासननिर्णय निर्गमित करणे, विनाअनुदानित व अंशअनुदानित शिक्षकांना सेवासंरक्षण लागू करणे, २००५ पूर्वी नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन लागू करणे तसेच वाढीव पदांना अनुदान मिळावे या मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली. या संदर्भात शिक्षण मंत्री महोदयांनी तातडीने माननीय मुख्यमंत्री यांची भेट घेऊन तसेच उपमुख्यमंत्री यांच्याशी संपर्क साधून चर्चा केली.

तद्नंतर त्यांनी विधिमंडळाच्या समिती कक्षात झालेल्या बैठकीत ही माहिती दिली की अधिवेशनादरम्यान विधान परिषदेत दिलेल्या आश्वासनानुसार निर्णय घेऊन यातील अधिकाधिक मागण्यांची पूर्तता शासन करणार आहे. यामुळे जवळपास ३५ ते ४० हजार शिक्षकांना त्यांच्या हक्काचे वेतन मिळणार आहे. आंदोलनाची दखल घेत त्वरीत पुढील पावले उचलल्याबद्दल मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच शिक्षणमंत्र्यांचे आभार कोकण शिक्षक मतदार संघाचे आमदार बाळाराम पाटील यांनी मांनले आहेत.

# महाडमधील तीन कारखान्यांवर बंदीची कारवाई

**दै.रायगड नगरी । महाड**

प्रदूषणाला करणीभूत ठरणार्या महाड औद्योगिक वसाहतीमधील तीन कारखान्यांना सप्टेंबर महिन्यात प्रदूषण नियंत्रण मंडळाने बंदची कारवाई केली आहे.

ओम केमिकल्स (प्लॉट नं.बी. ९/८ एमआयडीसी) ओमेसा ड्रग्ज अँड केमिकल्स प्रा.लि. (प्लॉट नं.डी.७) आणि अल्केमी इंडस्ट्रीज (प्लॉट नं. उ- ७४) हे ते तीन कारखाने आहेत. हे तिन्ही कारखाने प्रदूषण फौलावत असल्याच्या तक्रारी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या महाड येथील उपप्रादेशिक कार्यालयात प्राप्त झाल्या होत्या. त्या तक्रारींमध्ये तथ्य आढळल्यानंतर उपप्रादेशिक कार्यालयाने या कारखान्यांवर कारवाई करण्याची शिफारास वरिष्ठ कार्यालयाकडे केली होती.

त्या आधारे २ सप्टेंबर रोजी ओम केमिकल्सला, ७ सप्टेंबर रोजी ओमेसा ड्रग्ज अँड केमिकल्सला तर २६ सप्टेंबर रोजी अल्केमी इंडस्ट्रीजला आपले उत्पादन बंद करण्याची नोटीस प्रदूषण नियंत्रण मंडळाने बजावली. या कारखान्यांचा वीज पुरवठा खंडीत करण्याच्या सूचना महावितरणला आणि पाणी पुरवठा तोडण्याच्या सूचना औद्योगिक विकास महामंडळाला देण्यात आल्या आहेत.

# माथेरानला ई रिक्षा सुरू करण्यासाठी पालिकेचे युद्धपातळीवर काम सुरू

**दै.रायगड नगरी । माथेरान**



सर्वोच्च न्यायालयाने दि १२ मे रोजी ई रिक्षा सुरू करण्याचे आदेश दिले आहेत.आदेशाच्या अंमलबजावणीसाठी नगरपालिकेच्या कार्यतत्पर प्रशासक तथा मुख्याधिकारी सुरेखा भणगे ( शिंदे ) तसेच सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग युद्धपातळीवर काम करीत आहेत दि १३ सप्टेंबर रोजी सनियंत्रण समितीने पालिकेस सात ई रिक्षा खरेदीचे आदेश दिले होते. नगरपालिकेचे अभियंता स्वागत बिरंबोले यांनी अवघ्या दोन दिवसात ई रिक्षा खरेदीसाठी आवश्यक तांत्रिक मान्यता मिळवली आहे हे विशेष आहे. तांत्रिक मान्यतेस बराच कालावधी लागतो सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची पूर्तता करावयाची आहे व माथेरानचे जेष्ठ नागरिक, शालेय विद्यार्थी अपंग व्यक्ती,पर्यटक बऱ्याच दिवसापासून ई रिक्षाची वाट पाहत आहेत. तांत्रिक मान्यता मिळाल्याने ई टेंडर्स ची निविदा लवकरच निघेल त्यामुळे नोव्हेंबर च्या दुसऱ्या आठवड्यात ई रिक्षा सुरू होऊ शकतात अशी आशा पल्लवित झाली आहे.

राज्य सरकारचे वकील राहुल चिटणीस यांनी सुनावणी दरम्यान सुप्रीम कोर्टाला सांगितले की,हातरिक्षा चालकांना ई रिक्षा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून तीन महिन्यांच्या पायलट प्रोजेक्टची मागणी कोर्टाकडे केली होती जेणेकरून माथेरानच्या रस्त्यावर कोणत्या कंपनीच्या गाड्या चालू शकतात याची चाचपणी करणे तसेच गाडी मध्ये काही तांत्रिक बदल आवश्यक वाटल्यास करता येऊ शकतात त्यामुळे कोर्टाने राज्य सरकारला पायलट प्रोजेक्टची मान्यता दिली कोर्टाचा आदेश येऊन पाच महिने झाले असल्याने ई रिक्षा लवकरात लवकर सुरू व्हाव्या यासाठी नगरपालिकेचे प्रयत्न सुरू आ-हेत. गेल्या आठवड्यात जिल्हा नियोजन मंडळाची बैठक झाली त्यावेळी पालकमंत्री उदय सामंत यांनी देखील ई रिक्षा सुरू करण्याच्या कामाची सविस्तरपणे माहिती घेतली.

> मा सनियंत्रण समितीच्या निर्देशानु-सार, ई रिक्षा खरेदीसाठी सर्व प्रशासकीय बाबींची पूर्तता तसेच तांत्रिक मान्यता घेऊन ई निविदा प्रक्रिया करण्यास सूचित करण्यात आले असून, नगर पालिके मार्फत सर्व बाबींवरील कार्यवाही सुरु असून, येत्या दोन दिवसात ई निविदा प्रक्रिया करणार आहोत.
> **सुरेखा भणगे(शिंदे ) मुख्याधिकारी**

> पुढील महिन्यात ई रिक्षाची तारीख सर्वोच्च न्यायालयात लागू शकते त्यामुळे राज्य सरकारने सुप्रीम कोर्टा कडे मागणी केल्या प्रमाणे पायलट प्रोजेक्ट सुरू होणे आवश्यक आहे.
> ई रिक्षा मुले हात रीक्षाचालकांना आरोग्यदायी व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळणार आहे.
> **सुनिल शिंदे याचिकाकर्ते**

# प्रवासी कमी असल्याने पुणे-कर्जत-पुणे शटल गाडी रद्द ; गरीब प्रवाशांची गैरसोय

**दै.रायगड नगरी । कर्जत**

प्रवासी कमी असल्याच्या कारणांनी पुणे-कर्जत-पुणे शटल ही गाडी रद्द केली गेली आहे असे रेल्वे प्रशासनाने सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांना कळविल्याने 'गरिबांची गाडी' बंद केल्यामुळे आता गरिबांना सुद्धा आर्थिक भुर्दंड पडत आहे.

दोन वर्षांपूर्वी कोरोना मुळे देशभरात रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या. त्या नंतर त्या टप्या टप्याने हळू हळू रेल्वे गाड्या सुरू करण्यात आल्या आहेत परंतु कर्जत - पुणे दरम्यानची धावणारी शटल सेवा आजतागायत सुरू केली नाही. या गाडीचे भाडे इतर गाड्या पेक्षा कमी असल्या कारणाने ही गाडी फारच लोकप्रिय झाली होती. ही गाडी सुरू करण्याकरिता कर्जत रेल्वे पॅसेंजर्स असोसिएशन चे तत्कालीन उपाध्यक्ष स्वर्गीय मांगीलाल ओसवाल यांनी पाठपुरावा केला असता काही वर्षा पूर्वी पुणे - कर्जत - पुणे ही गाडी सुरु करण्यात आली होती.

कोरोना काळात बंद केलेली पुणे - कर्जत - पुणे आजतागायत सुरू न केल्याने प्रवाशांमध्ये नाराजी पसरली आहे. ही गाडी सुरू करावी या बाबतीत प्रवासी वर्गामध्ये खूपच मागणी आहे परंतु एव्हढे असूनही आज पर्यंत पुणे कर्जत पुणे ही गाडी सुरू करण्यात आली नाही. या बाबतीत कर्जत येथील सामाजिक कार्यकर्ते पंकज ओसवाल यांनी रेल्वे प्रशासनाकडे पाठपुरावा करताना पुणे - कर्जत - पुणे ही शटल सेवा अद्याप का सुरू केली गेली नाही? ती त्वरित सुरू करावी ही गाडी सुरू न केल्याने गरीब प्रवाशांना खूपच त्रास सहन करावा लागत आहे असे रेल्वे प्रशासनास कळविले असता रेल्वे प्रशासना कडून ओसवाल यांना पुणे - कर्जत - पुणे ही शटल सेवा रद्द केली आहे कारण सदर गाडीला प्रवासी कमी असतात असे लेखी उत्तर दिले आहे.

खरं तर हे न पटण्यासारखे कारण दिले गेले आहे कारण असून ही गाडी सुरू व्हावी याला मुख्य कारण म्हणजे गाडीचे भाडे एकदम कमी व गाडीची वेळ सर्वांना सोयीची होती तसेच ही गाडी कर्जत पर्यंत असली तरी पुण्याहून मुंबई पर्यंतचे तिकीट मिळते. ही गाडी सुरू झाल्यास गरिबांची चांगली सोय होईल.



# माणगांव तालुक्यात परतीच्या पावसामुळे भात शेतीचे मोठे नुकसान

**शासनाने रायगड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा**

**दै.रायगड नगरी । माणगव**

रायगड जिल्ह्यात माणगांव तालुक्यात परतीच्या पावसाने मोठा धुमाकूळ घातला असून ऑक्टोबर महिन्यात देखील पाऊस विजाच्या कडकडाट करून लागत असल्यामुळे बळीराजाच्या भात शेतीचे मोठे नुकसान झाले आहे.वर्षभर केलेली शेतकऱ्यांची मेहनत ही मातीमोल होऊन वाया गेली आहे. परतीचा पाऊस त्यामध्ये सोसाट्याच्या हवेने शेता मधील भात रोपे ही पाण्यात पडली असून त्यांना अंकुर आले आहेत.

शेतकऱ्यांच्या हातातोंडांशी आलेला घास परतीच्या पावसाने हिरावून घेतला आहे हाती आलेले पीक या मान्सूनमूळे वाया गेली आहेत. रायगड जिल्ह्यात अनेक शेतकऱ्यांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. ऑक्टोबर महिन्यात भात कापणीला शेतकरी सुरुवात करतात. संपूर्ण राज्यात पावसाने हाहाकार घातला असून काही भातशेतीत पावसाचे पाणी पूर्ण पणे भरल्याने ती शेती कापण्याच्या लायक देखील राहिली नाही. माणगांव तालुक्यात मोठ्या प्रमाणात काही शेतकरी बांधव आपली वडिलोपार्जित शेत जमिनी करत असून ते भात पिकासाठी वर्षे भर मेहनत करत असतात आपण पिकवलेल्या भातशेती मधून जो सुका पेंडा निघतो तो आपल्या ग्रुंसाठी वर्षभर जपून ठेवत असतात या वर्षी पावसाने शेतीचे मोठ नुकसान केल्याने गुरांसाठी सुका पेंडा देखील मिळणे महाकठीण झाले आहे. रायगड जिल्ह्यात माणगांव तालुक्यात परतीच्या पावसाने बळीराजाच्या भात पिकांचे मोठे नुकसान केले असून शासनाने रायगड जिल्ह्यात माणगांव तालुक्यात तात्काळ ओला दुष्काळ जाहीर करून नुकसान भरपाई द्यावी असे शेतकरी बळीराजा बोलताना दिसत आहे



# अज्ञात वाहनाच्या धडकेने इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

अज्ञात वाहनाच्या धडकेने एका इसमाचा मृत्यू झाल्याची घटना पनवेल जवळील जे कुमार इंफ्रापोजक्ट्स कंपनी समोरील रस्त्यावर घडली आहे.

पेण कडून पनवेल कडे जाणाऱ्या रस्त्यावरील जे कुमार इंफ्रापोजक्ट्स कंपनी समोर एका ३५ ते ४० वयोगटातील अनोळखी पुरुष इसमास कोणत्या तरी अज्ञात वाहनाच्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने चालवून त्यांना उडवल्याने झालेल्या अपघातात त्यांचा मृत्यू झाला आहे. या अपघातानंतर वाहन चालक वा-हनासह पसार झाल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# माझ्या पक्षाचं नाव गोठवलं, चिन्ह गोठवलं आणि निवडणुकीच्या रिंगणातून पळ काढला : उद्धव ठाकरे

**दै.रायगड नगरी । मुंबई**

माझ्या पक्षाचं नाव गोठवलं, चिन्ह गोठवलं आणि निवडणुकीच्या रिंगणातून पळ काढला. आपल्याला मनस्ताप द्यायचा, त्रास द्यायचा, शिवसेना संपवायची या हेतूने सगळं करण्यात आलं. पण शिवसेनेचं धनुष्यबाण चिन्ह गोठवलं तरी मशाल घेऊन आपण पुढे जात आ-होत. धनुष्यबाण रामाचा होता, त्या धनुष्यबाणाच्या मदतीनेच रावणाचा वध रामाने केला. आता अन्यायाला जाळणारी आणि अंधारात वाट दाखवणारी मशाल आपल्याकडे आहे ती घेऊन पुढे जात काम करू, असा विश्वास कार्यकर्त्यांच्या साथीने उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

बुलडाण्यातील शेकडो शिवसैनिकांनी 'मातोश्री'वर जाऊन उद्धव ठाकरे यांची भेट घेतली. मशाल हाती घेत आम्ही कायमस्वरुपी तुमच्यासोबत राहू, असा विश्वास उपस्थित शिवसैनिकांनी उद्धव ठाकरे यांना दिला. झुकेंगे नही लडेंगे, उद्धव ठाकरे यांचा विजय असो, शिवसे-नेचा विजय असो, अशा घोषणांनी शिवसैनिकांनी 'मातोश्री'चा परिसर दणाणून सोडला. त्यानंतर उद्धव ठाकरे यांनी शिवसैनिकांना संबोधित केलं.



लवकरच मी संपूर्ण महाराष्ट्राचा दौरा करणार आहे. आगामी काही दिवसांमध्ये मी बुलढाण्यातही येणार आहे आणि तिथे सभा घेणार आहे. पहिल्यात निवडणुकीत मशालीची ताकद दिसली. अंधेरीत पराभव दिसला की माघार घेतली. त्यांना शिवसेना संपवायची होती. पण शिवसेना एक अंगार आहे. ती कधीच संपणार नाही. जिथे अंधार असेल तिथे आपली मशाल जाईल, असं उद्धव ठाकरे म्हणाले.

गद्दारांनी कितीही आमिषं दाखवली, पण राजन साळवी खंबीरपणे आपल्यासोबत आ-हेत, अशा शब्दात उद्धव ठाकरे यांनी राजापूरचे आमदार राजन साळवी यांचं कौतुक केलं. गद्दारांनी आपल्याशी गद्दारी केली. पण त्यांच्या छाताडावर नाचून आपण भगवा फडकवू, असा विश्वासही उद्धव ठाकरेंनी यावेळी व्यक्त केला.

# एसटीच्या मरणकळा

राज्य परिवहन महामंडळ, म्हणजेच एसटीच्या मागे लागलेले आर्थिक अरिष्टाचे शुक्लकाष्ठ संपायला तयार नाही. सरकार बदलले म्हणजे एसटीचे भवितव्यही बदलेल अशी आस लावून बसलेल्या काही कर्मचाऱ्यांचा मात्र चांगलाच हिरमोड झाला. पगार वेळेवर मिळणे तर दुरापास्त झालेच, पण इंधनासाठीही पैसे शिल्लक नसल्याने पुणे, चंद्रपूर विभागातील एसटीच्या फेऱ्याही रद्द करण्याची नामुष्की ओढवली. एकीकडे संपानंतरच्या पगाराच्या सरकारी हमीला विद्यमान सरकारने सुरुवातीलाच हरताळ फासला असताना, दुसरीकडे बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा कामावर घेण्याचाही निर्णय घेतला. असंख्य समस्यांनी बेजार झालेली ही महाराष्ट्राची जीवनवाहिनी वयाची पंचाहत्तरी पार करताना पुढे टिकणार का, हा संभ्रम घेऊनच मार्गक्रमण करीत आहे. वास्तविक, गेल्या काही वर्षांपासूनच आर्थिक संकटांमुळे ती रस्त्यावरून घसरली होती. राज्य शासनानेही हवे तसे लक्ष दिले नाही. प्रवाशांवर सवलतींची मेहेरनजर करताना त्याची भरपाई करण्यास मात्र सगळ्याच सरकारांनी कानाडोळा केला. साहजिकच घटते प्रवासी, वाढते पगार, आजारी वाहने, खरेदीतील गैरव्यवहार अशी संकटांची मालिकाच चालू झाली. आठ हजार कोटींहून अधिक रुपयांचा महसूल मिळविणाऱ्या एसटीला लाखभर कर्मचाऱ्यांच्या वेतनावर ५३, तर इंधनावर ३५ टक्के खर्च करावा लागतो. प्रवासी करापोटी कोट्यवधींचा भरणा नियमित शासनाकडे जमा करावाच लागतो. परिणामी भांडवली खर्चासाठी पैसेच उरत नाहीत. मध्यंतरी हात दाखवा अन् एसटी थांबवा यासारखे काही उपक्रम तसेच दस्तुरखुद्द काही कर्मचाऱ्यांनीच अधिक महसूलवाढीचे उद्दिष्ट ठेवून केलेले काम, करोनाकाळात मालवाहतुकीचा पर्याय अशा काही चांगल्या उपायांची निश्चितच मदत झाली; तथापि, हे दात कोरून पोट भरण्यासारखे झाले. खासगी वाहतुकीच्या जीवघेण्या स्पर्धेत सरकारी एसटी जगायला हवी, हा विचार प्राधान्याने केला गेलाच नाही. खंगलेल्या एसटीपुढे खासगी कंपन्यांच्या सर्व सुविधायुक्त अशा स्मार्ट गाड्या प्रवाशांच्या पसंतीस न पडत्या तरच नवल होते. काटकसरीला सुरुवातीपासूनच फाटा दिलेल्या या आस्थापनेत खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा शहाणपणा कोणालाच सुचला नाही. एशियाड, शिवशाही, शिवनेरी अशा एकसे बढकर एक सुविधायुक्त गाड्यांची सेवा सुरू करुन खासगी ट्रॅव्हल्सशी स्पर्धा करण्याचा प्रयत्न केला गेला खरा; परंतु त्यासाठी खासगी कंपन्यांच्या गाड्या भाडेतत्त्वावर घेतल्याने हा सारा आतबट्ट्याचा व्यवहार ठरला. शासनाचे काम म्हटल्यावर ते सरळरेषेत धड होणारच नव्हते. वेड्यावाकड्या वळणांनी अशा अनेक चांगल्या योजना, उपक्रमांचा बोजवारा उडाला. करोना संकट हे जणू अपार ओझ्याखाली दबलेल्या एसटीवर अखेरची काडी पडल्यासारखे झाले. जवळपास दीड ते दोन वर्षे एसटीची चाके ठप्प होती. ही रुतलेली चाके वर काढणे शक्यच झाले नाही. अशातच संपाचे हत्यार उपसले गेले. कर्मचाऱ्यांच्या २८ संघटना हाही एका वेगळ्या अर्थाने अतिरेकच होता. हा आता इतिहास झाला; पण आपल्या हक्कांसाठी लढणाऱ्या या संघटनांनी एसटीच्या हितालाही अग्रस्थानी ठेवले असते तर कदाचित अडचणी कमी झाल्या असत्या. २७ संघटनांचा विरोध असतानाही संप मात्र दीर्घकाळ एकजुटीने चालला. कर्मचाऱ्यांची ही एकी अनेक संकटातही मजबूत राहिली. राजकारण्यांनी संप हायजॅक करण्याचा प्रयत्न केला. नेते बदलले. काही नेते नंतर चक्क परागंदा झाले. सरकार अडचणीत आहे म्हणून मग विरोधी पक्षांनीही तापलेल्या तव्यावर पोळी भाजून घेतली. न्यायालयालाही वारंवार हस्तक्षेप करावा लागला. अखेर सरकारने मासिक पगाराची हमी घेऊन पगारवाढीचा निर्णय घेतल्यानंतर संप मिटला. शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी काही मान्य होऊ शकली नाही. तथापि, तेव्हा या मागणीला हवा देणारेच आज सत्तेवर असताना, सगळेच निवांत आहेत. ही शांतता भयसूचक आहे. न्यायालयाला हमी देऊनही नव्या सरकारने दर महिन्याला द्यावयाच्या निधीत घसघशीत कपात करायला सुरुवात केली आणि रस्त्यावर येऊ पाहणारी एसटी पुन्हा घसरणीला लागली. सप्टेंबरच्या पगाराचे वांधे झाले. इंधनाची समस्या भेडसायला लागली. खासगी पेट्रोलपंप मालकांनी लक्षावधीची देणी थकल्याने डिझेल देणे बंद केले. पुन्हा ओरड सुरू झाली. अखेर शासनाने निधीची तरतूद करून संकटावर प्रासंगिक मात केली असली तरी दर महिन्यालाच आता या प्रश्नाला तोंड द्यावे लागणार. कर्मचाऱ्यांच्या पगारासाठीही तीनशे कोटी रुपये सरकारने मंजूर केले, तसेच निलंबित व बडतर्फ कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घेऊन किमान त्या आघाडीवर शांतता राहील, याची काळजी घेतली गेली. मात्र, भविष्यात त्यांनाच शासकीय सेवेत सामावून घेण्याचा मुद्दा पुढे येईल तेव्हा सरकारची खरी अर्थाने कसोटी लागेल. एसटी वाचवायची असेलच तर दीर्घकालीन हितकारक निर्णय घेण्याचे धाडस दाखवावे लागेल. पगारामुळे कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होईल हा, रास्त विचार झाला. आता एसटीचे दिवाळं निघणार नाही, हेही तेवढ्याच तत्परतेने पाहायला हवं.

# तेलीसमाज संपर्क मेळाव्याचे निमंत्रण व संघटनात्मक एकजुटीसाठी माणगांवात सभा

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

रविवार दि.१६ ऑक्टोबर रोजी दुपारी अडिच वाजता तेली समाजाचे रायगड जिल्हा महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा संघटनेचे पदाधिकारी व माणगांव शहर तेली समाज संघटनेची विशेष संयुक्त बैठक, शहर संघटनेचे उपाध्यक्ष उदय चौधरी यांचे निवास स्थानी दत्तनगर येथे संपन्न झाली. येत्या ११ डिसेंबर २०२२ रोजी सुधागड पाली येथे आयोजीत समाज संपर्क मेळाव्याचे आग्रहाचे निमंत्रण पत्रिका वाटप करुन समाजाची संघटनात्मक बांधणी व जिल्हास्तरिय एकजुटीच्या नियोजनासाठी संवाद साधण्यात आला.

महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा संस्थेच्या वतीने रायगड जिल्हा संपर्क मेळावा कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष खासदार रामदासजी तडस, प्रमुख अतिथी व सत्कारमूर्ती समाजभूषण तथा भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर बावनकुळे, या कार्यक्रमाचे उद्घाटक उद्योजक सुनील राम राऊत तसेच प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे कोषाध्यक्ष गजानन नाना शेलार, महासचीव प्रा. डॉ. भूषण कर्डिले, राज्य समन्वयक अध्यक्ष सुनील चौधरी, कोकण विभागीय अध्यक्ष सतीश वैरागी या मान्यवरांच्या हस्ते समाजाच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन देखिल होणार आहे.

हा कार्यक्रम अष्टविनायक श्री क्षेत्र बल्लाळेश्वर मंदिराच्या पावनभूमीत मराठा समाज हॉल, पाली, शिळोशी रोड, ता. सुधागड जि. रायगड या ठिकाणी संपन्न होणार आहे. रायगडातील अनेक तालुक्यातुन तेलीसमाज मोठ्या प्रमाणात असुन समाजाची कुटुंबे विखुरलेली तर काही ठिकाणी एकत्र वसाहती मध्ये, खेड्या पाड्यातही रहात आहेत.

या सर्व सदस्यांची एकजुट व सामाजिक सलोखा साधुन समाजाचे हित जोपासण्याचे दृष्टीकोनातुन रायगड जिल्हा संघटनेचे पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील तालुक्यातुन छोटेखानी दौरा काढला होता.

या दौऱ्यात संघटनेचे जिल्हाध्यक्ष गणेश महाडिक व पदाधिकारी गणेश धोत्रे, रविंद्र निगडे, संतोष पोटे, दिनेश बुटे, संदिप निगडे, प्रविण राणे, अविष्कार झगडे, हर्षल महाडिक आदि मान्यवर तसेच माणगांव शहर संघटनेचे अध्यक्ष मोरेश्वर (अण्णा) रायकर माजी अध्यक्ष दिलीप (बबडी) जाधव, उपाध्यक्ष उदय चौधरी तसेच तालुका अध्यक्ष कुवेसकर, विनोद सोनावणे, संतोष जाधव, सिध्देशभाई पिंगळे, नारायण चौधरी, मनसे चे रायगड जिल्हा उपाध्यक्ष समाजाचे युवा नेतृत्व प्रतिक रहाटे, तसेच सौ. कल्याणी कुवेसकर, सौ.विणा सोनावणे, सौ.कविता जाधव, सौ. चौधरी या समाज भगिणीही मोठ्या हिरहिरिने उपस्थित होत्या.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते आहे की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली जमीन मिळकत ही जमीन मालक / भोगवटादार १) श्री.अजित सुरेश भळगट, २) श्री.सुनील रामचंद्र पठारे यांचे नावे सामाईकपणे दाखल आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल हे कायमस्वरुपी खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदरहू जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे : धरणागाव, ता.पनवेल, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| ४ | २ | ००-५०-९० पो.ख. ००-०७-८० | ९.११ |
| पैकी हे.आर.पॉ. ००-२९-६७ जमिनीचे क्षेत्र हे या जाहीर नोटीसीच्या विषयाची जमीन मिळकत आहे. | | | |

वर नमूद केलेल्या जमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा अथवा व्यक्तींचा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत कुळ हक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, दिवाणी दावा, महसूलवाद असल्यास त्याच्या लेखी हरकती त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. याप्रमाणे हरकत मुदतीत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजून आमचे अशिल नमूद केलेले मालक / भोगवटादारा बरोबर ठरलेला कायम खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १८/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.अमित बाळाराम पाटील**
**यशोकिरण सोसायटी, ऑफिस नं.०५, तळमजला, सावरकर चौक, लोखंडीपाडा, पनवेल, ता.पनवेल-४१०२०६**

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री.अशोककुमार एम.जैन रा.फ्लॅट नं.१०३, राज टॉवर, प्लॉट नं.२१, सेक्टर-१९, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२१०, यांनी मुळ मालक कै.अनि धाया घरत (मयत) चे वारस, कै.नाग्या धाया घरत (मयत) चे वारस कै.हाशा नाग्या घरत (मयत) चे वारस १) श्री.जानू हाशा घरत, २) श्री.रामकृष्ण हाशा घरत, ३) श्री.गोपीनाथ हाशा घरत सर्व रा.रोहिंजण, ता.पनवेल, जि.रायगड यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकत सिडकोने १२.५ टक्के योजनेंतर्गत संपादीत करण्यात आलेली असून सदरहू संपादनापोटी मिळणारा भूखंड आमचे अशिल हे सिडको त्रिपक्षीय करारान्वये हस्तांतरीत करून घेणार आहेत. सदरहू भूखंडाचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : ओवे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नांव | युनिट केस / मिळकत नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र ए.गुंठे |
|---|---|---|---|---|
| ओवे | १८ | २१२ | १५ | ०-३-० |

तरी वरील वर्णन केलेल्या मिळकतीसंबंधी कोणा व्यक्ती, इसम, कंपनी यांची काणाचाही दान, गहाण, तारण, लिन, चार्ज, अगर खरेदी अथवा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, तिसंबंध, बोजा व हरकत अगर तक्रार असल्यास ती कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसात आम्हाला आमचे खालील पत्यावर समक्ष येवून भेटून त्याबाबत मुळ कागदपत्रानिशी वरील नमूद केलेल्या पत्यावर लेखी हरकत नोंदवून तशी लेखी पोहोच घ्यावी.

उपरोक्त १५ दिवसांत जर कोणाकडूनही कोणत्याही प्रकारची तक्रार अगर हरकत खालील पत्यावर न मिळाल्यास आमचे अशिल सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे असे समजून व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर मागाहून कुणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

कळावे
दि.१८/१०/२०२२

**सही/-**
**ॲड.रेखा होवाळे**
**शॉप नं.१३, सेक्टर १ ए, प्रभात सेंटर सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई-४००६१४**
**मो.नं.९८१९६३०६३२**

# दिपक फर्टीलायझर ॲण्ड पेट्रोकेमिकल्स कार्पोरेशन लिमिटेडच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबीर संपन्न

**दै.रायगड नगरी । पनवेल**

दिपक फर्टीलिलाझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कोर्पोरेशन लिमिटेड यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ईशान्य फाउंडेशन व लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने पाले खुर्द येथे मोफत नेत्र तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले.



या शिबिरास तळोजा विभागातुन उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून एकूण ३३१ रुग्णांची प्राथमिक तपासणी करण्यात आली असून त्यातील १६० रुग्णांना मोतीबिंदू असल्याचे निदान झाले, त्यांचे ऑपरेशन पनवेल येथील सुप्रसिद्ध नेत्र तज्ञ डॉ सुहास हळदीपूरकर यांच्या लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल येथे दिपक फर्टिलायझर मार्फत मोफत केले जाणार आहे. तसेच ९६ रुग्णांना दृष्टी दोष असल्याचे निदान झाले असून सदर रुग्णांना दिपक फर्टिलायझर्स मार्फत अल्प दरात चष्मे वाटप करण्यात येणार आहेत.

शिबिराचे उदघाटन श्रीमती पल्लवी नरेश मेहता तसेच अरुण शिर्के-एव्हीपी कॉर्पोरेट अफेयर्स, देवेंद्र कदम- एजीएम- बॅगिंग यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी संदीप काकडे- सिनिअर मॅनेजर- सी एस आर दिपक फर्टिलायझर, योगेश पाटील- प्रकल्प वव्यवस्थापक ईशान्य फाउंडेशन व टीमने शिबिराचे नियोजन केले. आबा पाचघरे व नेत्रचिकित्सक टीम लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल यांनी नेत्र तपासणी केली.

# श्री समर्थ कृपा कन्स्ट्रक्शनच्या प्लॉटचे परेश ठाकूर यांच्या हस्ते भूमीपूजन संपन्न

**दै.रायगड नगरी । पनेवल**

करंजाडे मध्ये श्री समर्थ कृपा कन्स्ट्रक्शनच्या सेक्टर ५ , प्लॉट ६५, येथे एका प्लॉटचे भूमीपुजन पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. येथील सामाजिक कार्यकर्ते मंगेश शेलार हे आपल्या सामाजिक कार्यासाठी नेहमीच चर्चेत असतात, तसेच ते एक चांगले व्यवसायिक सुद्धा आहे. त्यांचा श्री समर्थ कृपा कन्स्ट्रक्शन या नावाने स्वतःचा व्यवसाय आहे.

आजवर त्यांनी बरीच कन्स्ट्रक्शन काम योग्य पद्धतीने पूर्ण केली आहेत. सामाजिक कार्याबरोबर त्यांनी आपल्या व्यवसायामध्ये ही एक यशस्वीरित्या उंची गाठलेली आहे. त्यांच्या प्लॉटचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी परेश ठाकूर यांनी मंगेश शेलार यांना पुढच्या व्यावसायिक आणि सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी कर्णा शेलार, राजुशेठ, तानाजी शेलार, दिनेश शेलार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते



मा.इंदलकर साहेब यांच्या कोर्टात
**अर्जदारातर्फे वकील : ॲड.आशिष पनवेलकर**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसाहेब यांच्या न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.१०९४/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१४/११/२०२२

सौ.प्रियंका प्रकाश तांबे ... अर्जदार
विरुद्ध
ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत विचुंबे
ता.पनवेल, जि.रायगड ... सामनेवाला

तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांचा मुलगा कै. हितेन प्रकाश तांबे यांचा मृत्यू दि.०५/०६/२०२० रोजी राहत्या घरी राजेश गोंधळी चाळ, विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झाला होता.

अर्जदार यांचा मुलगा कै.हितेन प्रकाश तांबे यांची मृत्यूची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांच्या कोर्टात अर्ज केला आहे.

सदरहू कै.हितेन प्रकाश तांबे या वर नमूद ठिकाणी मृत्यू झाले आहे. या संदर्भात कोणालाही काही सांगायचे असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत पनवेल येथील मे.न्यायालयात स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून हरकत घ्यावी. तसे न केल्यास न्यायालय अर्जदार यांच्याकडून योग्य तो पुरावा घेवून योग्य ते आदेश करेल.

आज दि.१८/१०/२०२२ रोजी सही व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

मा.ए.एस.सोनवलकर साहेब
**अर्जदारतर्फे वकील**
**ॲड.रमेश खंडाकळे**

## जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.११६८/२०२२
ने.ता.२१/११/२०२२

गंगुबाई उर्फ आनंदीबाई अनंत घोरपडे
वय : ६० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नांदगाव, पो.पळस्पे, ता.पनवेल, जि.रायगड ... अर्जदार
विरुद्ध
ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी
ग्रुपग्रामपंचायत सांगुर्ली,
ता.पनवेल, जि.रायगड ... सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार हिचा जन्म दि.१८/०३/१९६० रोजी मौजे : चिंचवण, ता.पनवेल, जि.रायगड येथे तिच्या राहत्या घरी झालेला आहे. तिच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत सांगुर्ली यांच्या कार्यालयात करण्यात आलेली नाही. त्या कारणाने अर्जदार हिने मे.न्यायालयात फौजदारी चौकशी अर्ज दाखल केलेला आहे. तसेच हिचा जन्म दाखला देण्याबाबत ज्या कुणाच्या हरकती असतील त्या हरकती सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांत सदर न्यायालयात लेखी कळवाव्यात तसे न केल्यास सदरचा अर्ज निकाली काढण्यात येईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज दि.१८/१०/२०२२ रोजी दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**फौ.न्या.क.स्तर, पनवेल**

## ग्रामपंचायत आकुर्ली
### ता.पनवेल, जि.रायगड

जा.क्र.२६३/ग्रा.पं./आस्था २०२२
ग्रामपंचायत आकुर्ली
दि.१७/१०/२०२२

प्रति,

याद्वारे जाहीर करण्यात येते की, खालील तपशिलाचे ग्रामपचांयत आकुर्ली कर आकारणी नोंद वहितील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असून त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

(वाचा : मुंबई ग्रामपंचायत अधिनियम ८ नियम ३२ (१))

| अ.क्र. | भाग क्र. | स.नं./प्रॉ.नं./फा.प्लॉट/ सदनिका / गाळा नं. | जुने नाव | नवीन नाव |
|---|---|---|---|---|
| १ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/२६०७ | मे.बालाजी सिम्फोनी तर्फे विनय श्रवणकुमार अग्रवाल | सलमान हशामुद्दीन काझी सनम सलमान काझी |
| २ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/H/२२०७ | मे.बालाजी सिम्फोनी तर्फे विनय श्रवणकुमार अग्रवाल | वीना अनिलकुमार नायर के.अनिलकुमार नायर |
| ३ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/F/२३०५ | मे.बालाजी सिम्फोनी तर्फे विनय श्रवणकुमार अग्रवाल | गायत्री स्वप्नील नार्वेकर स्वप्नील आबा नार्वेकर |
| ४ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/A/२३०४ | मे.बालाजी सिम्फोनी तर्फे विनय श्रवणकुमार अग्रवाल | अमित तुलशीराम गुप्ता शिप्रा अमित गुप्ता |
| ५ | | बालाजी सिम्फोनी आकुर्ली ४०७/A/२३०४ | अमित तुलशिराम गुप्ता शिप्रा अमित गुप्ता | जगलदास पप्पू न्याटूवेटटी ज्योती जगलदास न्याटूवेटटी |
| ६ | | अपेक्षा कॉम्प्लेक्स आकुर्ली २०७ ब/G/१०८ | लक्ष्मण सातू गवस | आत्माराम गणपत लोखंडे प्रमिला आत्माराम लोखंडे |
| ७ | | कपालेश्वर अपार्टमेंट आकुर्ली ४०८/C1/२०१ | मे.जि.के.बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार तारकेश्वर लगनदेव ठाकूर | चंद्रकला मच्छिंद्र सुर्यवंशी मच्छिंद्र कृष्णा सुर्यवंशी |
| ८ | | वरदविनायक प्लाझा आकुर्ली ३२०/३०१ | डि.के.बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रो. प्रा.केशव गेनू गायकर | नरेश दत्ताराम कदम रेश्मा नरेश कदम |
| ९ | | मातेश्वरी कॉम्प्लेक्स आकुर्ली ३०८/C/००१ | रिमा रवींद्र पाटील रुचिता रवींद्र पाटील | अशोक भाऊ मोहिते विनोद भाऊ मोहिते |

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असून याबाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिद्धीचे दिनांकापासून सात दिवसांचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावी. वरील प्रमाणे नमूद दिलेल्या ममुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदल करणेत आलेनंतर प्राप्त होणाऱ्या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुंबई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२ (१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**सौ.भारती सचिन पाटील**
**सरपंच**
**ग्रामपंचायत-आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

**सही/-**
**श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत-आकुर्ली**
**ता.पनवेल, जि.रायगड**

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभापतीपदी अजय सावंत तर उपसभापती पदी घावरे



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मध्ये नुकत्याच पार पडलेल्या पतसंस्थेच्या निवडणुकीमध्ये शिवरात्र पॅनलचा मोठ्या मताधिक्याने विजय झाला होता आज पॅनलच्या सर्वच्या सर्व तेरा विजयी उमेदवारांनी पतसंस्था कार्यालयामध्ये जाऊन आपला पदभार स्वीकारला यावेळी सभापती व उपसभापती यांची निवड करण्यात आली.

माथेरान नगरीचे आर्थिक जीवन वाहिनी म्हणून पहिल्या जात असलेल्या पतसंस्थेच्या संचालक पदावरती असलेल्या सदस्यांना त्याचा काहीवेळा फायदा माथेरान नगरपालिका निवडणुकीमध्ये होत असतो त्यामुळे पतसंस्थेवर आपली सत्ता राहील यासाठी माथेरान मधले सर्वच राजकीय पक्ष प्रयत्नशील असतात त्यामुळे नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस व शिव–सेना ठाकरे गटाने शिवराष्ट्र पॅनेल बनवून अश्वपाल संघटना ,आरपीआय व मनसे च्या पाठिंब्यावर सर्व १३ जागांवर विजय संपादन केला होता. आणि भाजप, शिंदे गट व कॉग्रेस प्रणित पिसरनाथ पॅनलला निसटता पराभव पत्करावा लागला होता.

या माथेरान नागरी सहकारी पतसंस्थेच्या सभापती पदी रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरचिटणीस आणि माथेरानचे माजी नगराध्यक्ष अजय सावंत यांची तर उपसभापती पदी शिवसेनेच्या विनंती घावरे यांची बिनविरोध निवडणूक निर्णय अधिकारी श्याम कपोते यांच्या मार्गदर्शनाखाली निवड झाली. ह्यावेळी माथेरान राष्ट्रवादी शहराध्यक्ष राजेश दळवी, माथेरान शिवसेना ठाकरे गटाचे शहर प्रमुख श प्रसाद सावंत नेरळ ग्रामपंचायत सदस्य प्रथमेश मोरे,कर्जतचे मयूर जोशी, तसेच राष्ट्रवादी व शिवसेनेचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मजुरीची उर्वरित रक्कम वेळेवर न दिल्याने चौकडीने केली एकास जबरी मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मजुरीची उर्वरित रक्कम वेळेवर न दिल्याने चौकडीने एकास जबरी मारहाण करून त्याच्याकडील रोख रक्कम व मोबाईल फोन जबरीने घेतल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

ठेकेदार शिवाजी राठोड याने मजुरीची उर्वरित रक्कम वेळेवर न दिल्याने चार जणांनी एकत्र येऊन त्यांना लोखंडी रॉड ने मारहाण करून त्याचे तोंड दाबून त्याचे हातपाय रस्सीने बांधण्याच्या प्रयत्न करून त्याच्या कडील राहिलेल्या कामाचे पैसे, एटीएम कार्ड, आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल फोन अश्या जवळपास १७ हजार रुपये किमतीचा ऐवज जबरीने काढून घेतल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


## ग्रुप ग्रामपंचायत चिपळे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.१८/१०/२०२२

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत चिपळे हद्दीतील खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि.१९/१०/२०२२ ते २५/१०/२०२२ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.२५/१०/२०२२ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मौजे चिपळे येथील मुख्य रस्ता ते ग्रामपंचायत ऑफिस पर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे | ३०८३९०/– | ग्रामनिधी |
| २ | मौजे चिपळे येथील कमानी जवळ रस्ता रुंदीकरण करणे व पाईप गटार बांधकाम करणे | २२३४२०/– | ग्रामनिधी |
| ३ | मौजे चिपळे येथील गावातील अंतर्गत पेव्हर ब्लॉक बसविणे | ४०००००/– | १५ वा वित्त आयोग |

**अटी व शर्ती :–**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये ५०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/–**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**

**सही/–**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत चिपळे**


# जिल्ह्यातील २९ हजार १५९ शेतकऱ्यांना कर्जमुक्ती योजनेत प्रोत्साहनपर लाभ

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

राज्य सरकारने सन २०१९ मध्ये महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना जाहीर केली होती. त्यातील पुढील टप्प्यात शासनाने दि.२९ जुलै २०२२ रोजी नियमित कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदानाची योजना जाहीर केली आहे. त्यानुसार सन २०१७–१८, सन २०१८–१९, सन २०१९–२० या तीन वर्षापैकी कोणत्याही दोन वर्षात नियमित परतफेड करणाऱ्यांसाठी ही योजना आहे. तीन वर्षात किमान दोन वर्ष नियमित हप्ते फेडणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये ५० हजारापर्यंतचा लाभ शेतकऱ्याचे बँक खातेत थेट जमा होणार आहे.

या योजनेतील पहिल्या टप्प्यातील लाभार्थ्यांची यादी राज्य सरकारने दि.१४ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रसिध्द केली आहे. शेतकऱ्यांच्या आधार प्रमाणिकरणानंतर ही रक्कम बचत खात्यावर वर्ग होईल. रायगड जिल्ह्यातील एकूण २९ हजार १५९ कर्जदारांची माहिती राज्य सरकारच्या पोर्टलवर देण्यात आली आहे. यामध्ये रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील २८ हजार ६५२ आणि राष्ट्रीयकृत बँकांतील ५०७ कर्जदारांचा समावेश आहे. त्यातील पहिल्या टप्प्यात १३ हजार ३०० लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.

पहिल्या टप्प्यात लाभ मिळणाऱ्यांच्या याद्या विविध कार्यकारी सहकारी संस्था, सबंधीत बँकाच्या शाखा, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात प्रसिध्द करण्यात आल्या असून लाभार्थ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्र/ सीएससी/बँक शाखेस भेट देवून विशिष्ट क्रमांकाच्या अनुषंगाने आपल्या कर्ज खात्याचे आधार कार्डच्या सहाय्याने आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. आधार प्रमाणिकरणासठी जाताना कर्जदाराने आपले आधारकार्ड, विशिष्ट क्रमांक, बँक पासबूक आदी कागदपत्रे सोबत ठेवावयाची आहेत. आधार प्रमाणीकरणासाठी आपले सरकार सेवा केंद्राकडून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. आधार प्रमाणीकरण करताना अडचणी येत असल्यास त्याबाबत ऑनलाईन तक्रार प्रणालीद्वारे दाखल करता येणार आहे.

आधार क्रमांक अमान्य असल्यास किंवा लाभाची रक्कम अमान्य असल्यास ऑनलाईन तक्रार प्रणालीद्वारे जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीकडे तक्रार दाखल करता येणार आहे. तसेच लाभार्थ्यांच्या अंगठ्याचे ठसे येत नसल्याने आधार प्रमाणीकरण करणे शक्य नसल्याने त्यांना ऑनलाईन प्रणालीद्वारे तहसिलदारांच्या अध्यक्षतेखालील तालुकास्तरीय समितीकडे तक्रार दाखल करता येईल. तक्रारदाराने आवश्यक कागदपत्राची पूर्तता केल्यानंतर तक्रार निकाली काढण्यात येईल. दि.१७ ऑक्टोबर २०२२ अखेर पहिल्या यादीतील एकूण १३ हजार ३०० पैकी ११ हजार ०२६ म्हणजे ८२.८३ टक्के शेतकऱ्यांनी यशस्वीरीत्या आधार प्रमाणीकरण पूर्ण केले आहे. आधार प्रमाणिकरण पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर दि.२० ऑक्टोबर २०२२ पासून प्रोत्साहन रक्कम वर्ग करण्यास सुरुवात होणार आहे. त्याकरिता आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया दि.१९ ऑक्टोबर २०२२ पर्यत पूर्ण करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, जिल्हा उपनिबंधक डॉ.सोपान शिंदे व जिल्हा अग्रणी बँक श्री.विजयकुमार कुलकर्णी यांनी केले आहे.

# इनरव्हील क्लबच्यावतीने रक्तदान शिबिर

**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत मधील इनरव्हील क्लबच्यावतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, यावेळी २५ रक्तदात्यांनी रक्तदान केले.

शनी मंदिराच्या सभागृहात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते रक्तदान शिबिराचे उदघाटन करण्यात आले, इनर व्हील क्लबच्या अध्यक्षा उत्तरा वैद्य यांनी उपस्थितांचे स्वागत केले,मालिनी नागडा (शहा) यांनी सर्व प्रथम रक्तदान करून शिबिराचा शुभारंभ केला.रक्त संकलनाचे काम संकल्प ब्लड बँक कल्याणच्या डॉ.सोनाली देसाई, राजशेखर नायर, कीर्ती सिंग, समृद्धी देसाई, पार्वती गायकवाड यांनी केले, त्यांना सार्वजनिक रक्तदाते राजाभाऊ कोठारी यांनी सहकार्य केले.

याप्रसंगी करुणा पराडकर, वनिता सोनी, मोनिका बडेकर, ज्योत्स्ना शिंदे, प्राची चौडीए, अवंतिका गायकर, तन्वी जोशी, मधुरा मुळे, पल्लवी सावंत,शीला गुप्ता, संजीवनी घुमरे, साक्षी अडसुळे, सरस्वती चौधरी, शितल पाटील, रूपा खन्नाल, वैशाली दांडेकर, आशा ठोंबरे उपस्थित होत्या.


मा.सोनावणे साो

**अर्जदारातर्फे ॲड**
**ॲड.अभिमन्यू हिंदुराव जाधव**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश साो.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१३९९/२०२२
नि.नं.८/ड

१) श्री.दयानंद दिनकर दुदवडकर, वय : ८४
रा.एस.टी.डेपो, १८/बीए, चिरंतन को.ऑप.
सोसायटी, शिव सृष्टी, एस.जी.बर्वे मार्ग, नेहरु नगर,
मुंबई, महाराष्ट्र–४०००२४
२) सौ.दिपाली किरण पवार, वय : ५१
रा.बिल्डींग नं.२६, फ्लॅट नं.डी–६०२, हर्ष सीएचएस,
टिळक नगर, सहारा सिनेमाजवळ, मुंबई,
सुबुरबन, महाराष्ट्र–४०००८९
३) सौ.दर्पणा अतुल गवंडी, वय : ४७
रा.लोढा अमरा विंग ०९, फ्लॅट नं.२६०३,
कसा फ्रेसको एच ब्लॉक, कोलशिट रोड, एअर फोर्स
स्टेशनजवळ, ठाणे, महाराष्ट्र–४००६०७
४) श्री.नुपूर दयानंद दुदवडकर, वय : ४२
रा.एस.टी.डेपो, १८/बीए, चिरंतन को.ऑप.सोसायटी,
शिव सृष्टी, एस.जी.बर्वे मार्ग, नेहरु नगर,
मुंबई, महाराष्ट्र–४०००२४ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविण्यात येते की, कै.श्रीमती.नंदिनी दयानंद दुदवडकर यांचे निधन दि.१४/०१/२०२२ रोजी नेहरु नगर, मुंबई येथे राहत्या घरी झाले आहे. १) श्री.दयानंद दिनकर दुदवडकर, वय : ८४, रा.एस.टी.डेपो, १८/बीए चिरंतन को.ऑप.सोसायटी, शिव सृष्टी, एस.जी.बर्वे मार्ग, नेहरु नगर, मुंबई, महाराष्ट्र–४०००२४, २) सौ.दिपाली किरण पवार, वय : ५१, रा. रा.बिल्डींग नं.२६, फ्लॅट नं.डी–६०२, हर्ष सीएचएस, टिळक नगर, सहारा सिनेमाजवळ, मुंबई, सुबुरबन, महाराष्ट्र–४०००८९, ३) सौ.दर्पणा अतुल गवंडी, वय : ४७ रा.लोढा अमर विंग ०९, फ्लॅट नं.२६०३, कसा फ्रेसको एच ब्लॉक, कोलशिट रोड, एअर फोर्स स्टेशनजवळ, ठाणे, महाराष्ट्र–४००६०७, ४) श्री.नुपूर दयानंद दुदवडकर, वय : ४२ रा.एस.टी.डेपो, १८/बीए, चिरंतन को.ऑप.सोसायटी, शिव सृष्टी, एस.जी.बर्वे मार्ग, नेहरु नगर, मुंबई, महाराष्ट्र–४०००२४ यांनी या कोर्टात सदर मयत कै.श्रीमती.नंदिनी दयानंद दुदवडकर यांच्या मालकीच्या खालील वर्णनाच्या मिळकतीचे वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीतील शॉप नं.२५, तळमजला, बिल्डींग क्र.८, मानसरोवर कॉम्प्लेक्स, गावठाण प्लॉट नं.१, २, ४ ते ६, १९ ते २६, सेक्टर ३४, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२०६, क्षेत्र २४.९८ चौ.फुट, बिल्टअप एरिया, अशा वर्णनाची मिळकत**

कै.श्रीमती.नंदिनी दयानंद दुदवडकर यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार हेच कायदेशीर वारसदार आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार सदरचा वारस दाखला मिळवण्यासाठी अर्ज करीत आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त इतर कोणाच्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



प्रो.जमा.६–२५

**ॲड.विजय गणेश गडगे**
**ॲड.सागर गोंधळी**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर साो.यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१४५८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२८/११/२०२२

१) कौसर अली नबीरहम सिद्दीकी
वय : ५९ वर्षे, व्यवसय : नोकरी
रा.कौसर टिंबर मार्ट, धारावी मेन रोड,
अभ्युदया बँक समोर, धारावी मुंबई
२) आमीन नबीरहम व नबीरेहम चौधरी
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.८०५, आशियाना टॉवर, रिलिफ रोड,
एच.के.कॅम्पस समोर, ओशिवरा,
अंधेरी वेस्ट, आझाद नगर, मुंबई
३) फारुक नबीरहम चौधरी
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.शॉप नं.२६२, कौसर टिंबर मार्ट,
धारावी मेन रोड, अभ्युदया बँक समोर, धारावी, मुंबई
४) फरहान नबी रहम सिद्दीकी
वय : ३६ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.रुम नं.३०४, बिल्डींग नं.२, ए विंग, कौस्टल
टॉवर हौ.सो.वैशाली नगर, जोगेश्वरी (वेस्ट), मुंबई
५) झुबेदा खातून मोहमद मुबीन चौधरी
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी झुबेदा नबीरहम सिद्दीकी
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.३०३, बी.न्यू.संगम हौ.सो., कपासवाडी, जूहू,
वर्सोवा, लिंक रोड, झॅफ क्लब फिटनेस जवळ,
अंधेरी वेस्ट, आझाद नगर, मुंबई
६) आबेदा अब्दुल वहीद चौधरी
पुर्वाश्रमीचे नाव कुमारी आबेदा नबीरहम चौधरी
वय : ४६ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.ए/२०२, हिल ब्रिझ को.ऑप.हौ.सो.,
त्रिवेणी नगर कोकणी पाडा समोर,
कुरात गांव, मालाड ईस्ट, मुंबई अर्जदार

ज्याअर्थी मयत अब्रुनिस्सा नबीरहम खान उर्फ सिद्दीकी ही दि.२५/०३/२०१८ रोजी मौजे : मु.एस.आर.वि. हॉस्पिटल गोरेगाव (वे), ग्रेटर मुंबई येथे मृत्यू पावली असून तिचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : शेडुंग, ता.पनवेल, जि.रायगड**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ५८ | ०–१३–९० पो.ख.०–०२–३० | २.६९ |

मयत अब्रुनिस्सा नबीरहम खान उर्फ सिद्दीकी हिचे मृत्यूपश्चात तीस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नही.

आज दि.१८/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.गुन्नाल साहेब

**ॲड.हेमा एस. भगत**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल
चौ.अर्ज क्र.१४८५/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.५/१२/२०२२

१) श्रीमती.सविता वसंत माने
वय : ६० वर्षे, व्यवसाय : गृहिणी
२) श्री.रवींद्र वसंत माने
वय : ४१ वर्षे, व्यवसाय : नोकरी
३) श्री.निलेश वसंत माने
वय : ३९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
४) श्री.शैलेश वसंत माने
वय : ३७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
सर्व रा.सदनिका क्र.४०४ ए विंग, चौथा मजला,
परिवर्तन सोसायी, प्लॉट नं.२७/२८/३०/३१/१, ३१,
सेक्टर ६ ए, कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड
५) सौ.रेश्मा अभिजीत गायकवाड
वय : वर्षे, व्यवसाय :
रा.८३७१/५० रेल्वे लाईन,
फॅरेस्ट वाडीया हॉस्पिटल समोर सोलापूर अर्जदार

कै.वसंत नाना माने यांचे नावे असलेल्या मिळकती खालीलप्रमाणे

| शहर | सदनिका क्र. | किंमत |
|---|---|---|
| कामोठे | सदनिका क्र.४०४ ए विंग, चौथा मजला, परिवर्तन सोसायटी, प्लॉट नं.२७/२८/३०/३१/१,३१, सेक्टर ६ ए, कामोठे, ता.पनवेल | ४,९५,०००/– |

सदरहू वरील अर्जदार क्र.१ ह्या कै.वसंत नाना माने यांच्या पत्नी आहेत व अर्जदार क्र.२, ३ व ४ हे त्यांचे मुलगे आहेत व अर्जदार क्र.५ ही त्यांची विवाहित मुलगी आहे. कै.वसंत नाना माने यांचे निधन दि.२४/०९/२०१९ रोजी डी वाय पाटील हॉस्पिटल नेरुळ येथे झाले आहे. कै.वसंत नाना माने यांच्या निधनाची नोंद नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये केलेली असून नवी मुंबई महानगरपालिकेने कै. वसंत नाना माने त्यांच्या मृत्यूचा दाखला दिलेला आहे. सदर दाखला अर्जासोबत जोडलेला आहे.

वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला अहे. त्यापेक्षा सदरहू मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/१०/२०२२ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



प्रो.जमा.२–२५

**अर्जदाराचे वकील**
**ॲड.प्रवीण बा. म्हात्रे**

### जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश (क.स्तर) यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज क्र.१८१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/१२/२०२२

१) श्री.कृष्णा काशिनाथ भगत
वय : ६० वर्षे, धंदा : शेती
रा.कंठवली, पो.दिघोडे, ता.उरण, जि.रायगड ४१०२०६
२) श्रीमती.लिला रघुनाथ पाटील
वय : ५९ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी
रा.भोम, पो.चिरनेर, ता.उरण, जि.रायगड ४१०२०६
३) श्रीमती.गिता उर्फ कमळ गणेश पाटील
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी
रा.नारंगी, पो.नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड
४) श्रीमती.वनिता संदेश पाटील
वय : ४६ वर्षे, धंदा : शेती व गृहिणी
रा.रामवाडी, पो.पेण, ता.पेण, जि.रायगड अर्जदार

विरुद्ध

१) श्री.चंद्रकांत काशिनाथ घरत
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
रा.आर.एच.१, सेक्टर क्र.०७, रुम नं.५०,
जुना एम.टी.एन.एल. कार्यालयासमोर, वाशी, नवी मुंबई
२) श्रीमती.अनुसया अनंत ठाकूर
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती
रा.धुतूम, ता.उरण, जि.रायगड ४१०२०६ सामनेवाला

ज्याअर्थी कै.यशोदा काशिनाथ घरत यांचे नावे असलेल्या मौजे : वालटीखार, पागोटे, सावरखार, ता.उरण, जि.रायगड येथे सदरहू मिळकत क्र.अ या जमीन मिळकती होत्या. सदरहू मिळकती या शासनाने नवी मुंबई प्रकल्पाकरिता भूसंपादनात समाविष्ट केलेल्य आहेत.त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन (मिळकत क्र.अ)**
**मौजे : वालटीखार, पागोटे व सावरखार, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | युनिट केस क्र. |
|---|---|---|---|---|---|
| १ | वालटीखार | ३७ | १७ | ०–२५–६० | १३+९७/८६ |
| २ | वालटीखार | ३८ | ५ | ०–१६–३० | १३+९७/८६ |
| ३ | पागोटे | १७८ | ब/२ | १–१२–० | ३२८ |
| ४ | सावरखार | १५४ | ग/५ | ०–५०–० | ३७/८६ |

तसेच कै.यशोदा काशिनाथ घरत यांचे नावे सामाईक मालकी हक्क, ताबेकब्जा व वहिवाटीतील खालीलप्रमाणे शेतजमीन मिळकती होत्या व आहेत. त्या मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन (मिळकत क्र.ब)**
**मौजे : पागोटे व धुतूम, ता.उरण, जि.रायगड**

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १ | पागोटे | १७८ | २ अ | ०–४५–४० पो.ख.०–०६–६० एकूण ०–५२–०० | ०.०० |
| २ | धुतूम | ३ | ५० | ०–०३–३० | ०.१२ |
| ४ | धुतूम | ५९ | १० | ०–२६–०० पो.ख.०–०४–०० एकूण ०–३०–०० | ०.९१ |

कै.यशोदा काशिनाथ घरत यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार व समानेवाला हेच वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/१०/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.क.स्तर, उरण**

# संक्षिप्त...

## दीपावली सणाच्या खरेदीचा उत्साह ; बाजारपेठेत वाढू लागली गर्दी



**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

वर्षातील महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या दीपावली सणाच्या खरेदीसाठी ग्राहकांची बाजारात हळूहळू गर्दी वाढू लागली असून खरेदीचा चांगलाच उत्साह दिसून येत आहे.

वर्षभरात साजरे केले जाणाऱ्या विविध सणांपैकी दीप–ावली या सणाबाबत आबालवृद्धांपासून सा–यांनाच विशेष आकर्षण असते. तर समाजातील सर्वच स्तरातील व्यक्ती आपापल्या ऐपतीनुसार हा सण तितक्याच उत्साहाने साजरा करतात.पाच दिवसाच्या या सणामध्ये प्रत्येक दिवसाचे एक वेगळे दिनविशेष असल्याने प्रत्येक दिवसासाठी लागणा–या विविध स्वरूपातील वस्तू खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी बाजारपेठेत हळूहळू गर्दी करण्यास प्रारंभ केला आहे.

बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची आपल्या दुकानाला पहिली पसंती मिळावी या साठी दुकानदारानीही आपापली दुकाने विविध प्रकारे सजवून ठेवली आहेत. तर किराणा सामान, फटाक्यांची दुकाने, इलेक्ट्रॉनिक वस्तू, फुलवाले, कटलरी दुकाने, कपड्याची दुकाने, मिठाईची दुकाने, गृहपयोगी वस्तूंची दुकाने आदी दुकानात ग्राहकांची विशेष गर्दी दिसून येत आहे.

शेती क्षेत्राला परतीच्या पावसाचा बसत असलेला फटका व अद्याप भाताचे एकही कणीस शेतकरी वर्गाने कापले नसल्याने ऐन दीपावलीचे तोंडावर शेतकरी वर्गासमोर मोठेच संकट उभे राहिले असल्र्याचे एकंदरीत परिस्थितीवरुन दिसून येत आहे.


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


## आवरे - कडापे शाळेत पणती रंगकाम स्पर्धा संपन्न

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील आवरे – कडापे येथील विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील विविध कौशल्ये वाढीस लागावीत या अनुषंगाने काल दि.१८ ऑक्टोबर २०२२ रोजी उरण तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद प्रार्थमिक शाळा कडापे येथे प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी पणतीवरील रंगकाम व नक्षीकाम स्पर्धा संपन्न झाली. सदर स्पर्धेचे आयोजन शाळेतील शिक्षकांनी केले होते. ह्या स्पर्धेत शाळेतील पहीली ते पाचवीचे सर्व विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले होते. शाळेचे मुख्याध्यापक हितेंद्र म्हात्रे व उपशिक्षक रमेश पाटील यांनी स्पर्धेचे गुणांकन करून विजेत्या स्पर्धकांचे अभिनंदन केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मौजे : कोळखे, ता.पनवेल येथील मिळकत श्री.दिपक अनंत जितेकर व श्रीमती.वनिता अनंत जितेकर यांचे नावे महसूल दप्तरी ७/१२ चे कब्जेदार सदरी जमीन मालक म्हणून आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड**

| मालक/कब्जेदाराचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| दिपक अनंत जितेकर वनिता अनंत जितेकर | १६० | ०–१८–२० | २–८१ |

मौजे कोळखे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक ७/१२ मधील नमूद कब्जेदार श्री.दिपक अनंत जितेकर व श्रीमती.वनिता अनंत जितेकर यांची वरील नमूद शेतजमीन मिळकत आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताचे अनुषंगाने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या शेतजमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून २१ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद जमीन मालक / कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेला कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १९/१०/२०२२

**सही/–**
**मयुरेश प्र. हनुमंते**
**ॲडव्होकेट–हायकोर्ट**
**शॉप नं.बी/१०१, योगेश्वर कृपा बिल्डींग, ठाणा नाका रोड, ता.पनवेल, जि.रायगड**
**मो.नं.८२८६१२१३३३**


# वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र रंगनाथ दौंडकर यांना गुणवत्तापूर्ण सेवेकरिता राष्ट्रपती पदक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रविंद्र रंगनाथ दौंडकर यांना गुणवत्तापूर्ण सेवेकरिता राष्ट्रपती पदक मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. खेड तालुक्यासाठी ही अभिमानाची बाब आहे.

रविंद्र दौंडकर यांचे वडील स्वर्गीय .ह.भ.प.रंगनाथ बाबा दौंडकर हे वारकरी संप्रदायात कार्यरत होते, त्यामुळे संस्काराची शिदोरी त्यांना बालपणीच मिळाली. बीकॉम पदवी घेतल्यानंतर रविंद्र दौंडकर हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परिक्षा प्रथम प्रयत्नात महाराष्ट्रात ५०व्या क्रमांकाने उत्तीर्ण झाले. पोलीस उपनिरीक्षकपदी त्यांची निवड झाली. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे खडतर प्रशिक्षण पुर्ण केल्यानंतर शिवाजीनगर पोलीस स्टेशन, गोवंडी येथे १९९६ साली सेवेत रूजू झाले. आजतागायत मुंबई, ठाणे, पुणे, अँटी करप्शन ब्युरो, ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात त्यांनी आतापर्यंत २८ वर्ष कर्तव्य बजावले आहे .रविंद्र दौंडकर यांनी पोलीस खात्यातील सर्वोत्कृष्ट अधिकारी म्हणून नावलौकिक मिळविला आहे. पोलीस सेवेत असताना कायद्याचे सखोल ज्ञान प्राप्त व्हावे या उद्देशाने त्यांनी एल.एल.बी व एल.एल.एम या पदव्याही संपादन केल्या आहेत.



कनेरसर गावातील अनेक धार्मिक, शैक्षणिक, सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचे मोलाचे यो–गदान असते. पोलीस खात्यातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांना ५०० पेक्षा जास्त बक्षीसे व प्रशंसापत्रासहित रोख रक्कम रू.४ लाख पेक्षा जास्त मिळाली आहे. रविंद्र दौंडकर यांनी अनेक गंभीर गुन्हे आपल्या कौशल्यपूर्ण तपासामुळे उघडकीस आणलेले आहेत. त्यामुळे तत्कालीन स्वर्गीय गृहमंत्री आर.आर.पाटील यांच्या हस्ते बेस्ट डिटेक्शन ऑफीसर म्हणून त्यांचा गौरव करण्यात आला होता. मुंबई, ठाणे व नवी मुंबईतील संवेदनशील अशा विविध पोलीस स्टेशनमध्ये काम करण्याची संधी त्यांना मिळाली. २००८ साली सहाय्यक पोलीस निरीक्षक व २०१३ साली पोलीस निरीक्षकपदी त्यांची पदोन्नती झाले. ठाणे येथे अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्षाचे प्रमुख म्हणून कार्यरत असताना बांगलादेश, नेपाळ वा इतर देशांतून मुंबई येथे होत असलेला अनैतिक मानवी वाहतूक बाबींचा व्यापार याबाबत कठोरपणे कारवाई केली. आपल्या आजपर्यंतच्या कार्यकाळात रविंद्र दौंडकर यांनी अनेक गंभीर गुन्हे उघडकीस आणून गुन्हेगारांना जेरबंद केले व त्यांचेविरुद्ध सबळ पुराव्यानिशी दोषारोपपत्र दाखल करून दोषसिद्धी मिळविली आहे. कर्तव्य कठोर परंतु समाजासाठी तळमळ व्यक्त करणारे दौंडकर हे सामाजिक उपक्रमांमध्ये नेहमीच सहभागी होतात. कोरोना प्रादुर्भाव वाढल्याने मुंबईतून लोक मोठ्या संख्येने बाहेरगावी जात होते. रविंद्र दौंडकर तेव्हा वाशी पोलीस स्टेशनला कार्यरत होते. त्यांनी लोकांसाठी बिस्किटे, फळे,खाद्यपदार्थ याचे वाटप वरिष्ठ अधिकारी यांच्या सहकार्याने केले. अत्यवस्थ असलेले अनेक कोरोना पेशंटना त्यांनी तात्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करून देऊन त्यांचे प्राण वाचविले आहेत. सॅनिटायजर, मास्क, प्रतिबंधक गोळ्या याचे वितरण पोलीस कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय तसेच व्यावसायिक, नोकरवर्ग यांना केले.

रविंद्र दौंडकर यांनाही कोरोनाने गाठले ,त्यावर मात करून ते पुन्हा कर्तव्यावर रूजू झाले.गेली दोन वर्षांपासून ते पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून जबाबदारी पाहत असताना कोरोना संकटकाळात सर्वतोपरीने नागरिकांमध्ये जनजागृती करून सामाजिक बांधिलकी जोपासली आहे. रविंद्र दौंडकर यांच्या कार्याची दखल वेळोवेळी सामाजिक संस्थांबरोबरच पोलीस खाते व शास–नानेही घेतली आहे. १ मे २०१८ रोजी त्यांना पोलीस खात्यातील मानाचे पोलीस महासंचालक पदक मिळाले आहे. पोलीस खात्यामधील राष्ट्रपती पोलीस पदक हा सर्वोच्च सन्मान आहे. रविंद्र दौंडकर यांना २६जानेवारी २०२१ रोजी गुणवत्तापुर्ण सेवेसाठीचे राष्ट्रपती पोलीस मेडल मिळाल्याचे जाहीर झाले व सदर मेडल त्यांना दि.१३/१०/२०२२ रोजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते राजभवन येथे बहाल करण्यात आले आहे. त्यांच्या सेवाकार्याला उचित असा बहुमान मिळाला. रविंद्र दौंडकर हे खेड तालुक्यातील कनेरसर गावचे रहिवासी असल्याने त्यांचे अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले आहे .

## फेरीवाल्यांवर संक्रांत गावात येण्यास मनाई, ग्रामपंचायत हद्दीत फलकबाजी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

मुलांना पळवून घेऊन जाणाऱ्या घटना सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल होत आहेत. त्यामुळे सावध राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. त्यातच पनवेल तालुक्यात काही ग्रामपंचायतींनी बाहेरील फेरीवाल्यांनी गावात येण्यास मनाई केली आहे. अशा प्रकारचा बॅनर त्यांनी ग्रामपंचायत हद्दीत लावले असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे हे बॅनर ग्रामपंचायत तर्फे लावण्यात आले आहेत.

मुलांना पळवून नेत असल्याच्या बातम्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. कोणतीही शहानिशा न करता अशा प्रकारचे व्हिडिओ फॉरवर्ड केले जात आहेत. त्या अनुषंगाने पनवेल तालुक्यात खबरदारी घेतली जात आहे. विचुंबे ग्रामपंचायतने गावात येणाऱ्या प्रत्येक फेरीवाले, भंगारवाले, ढोंगी बाबा, अनोळखी व्यक्ती यांना गावात येण्यास मनाई केल्याचा बॅनर लावला आहे. तर चिपळे ग्रामपंचायतने देखील विहिघर गावच्या स्टॉपवर अशा प्रकारचा बॅनर लावलेला दिसून येत आहे. यावेळी पालकांनी आणि मुलांनी सावध राहून काळजी घेण्याचे आवाहन त्या बॅनर मधून करण्यात आले आहे. फेरीवाले म्हणजे हातावर पोट भरणारी माणसं. दिवसभर गावामध्ये किंवा आठवडी बाजारात फिरून ते आपल्या मालाची विक्री करतात. मात्र सध्या गावांमध्ये फेरीवाल्यांना बंदी करण्यात आल्याने त्यांच्यावर संक्रांत आली आहे.

त्यांना उपासमारीचा सामना करावा लागत आहे. काही फेरीवाले प्रामाणिकपणे आपला व्यवसाय करतात. त्यामुळे या बंदीमुळे प्रामाणिक फेरीवाल्यांना हा त्रास सहन करावा लागत आहे.

अशा प्रकारच्या बॅनरबाजी बाबत एका पोलिस अधिकाऱ्याला विचारले असता पनवेल परिसरात अशा कोणत्याही प्रकारच्या घटना घडल्या नसल्याचे सांगून ही बॅनरबाजी चुकीची असल्याचे त्यांनी नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले.


**अर्जदाराचे वकील**
**ॲड.हेमा भगत**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील सह दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर पनवेल
चौ.अर्ज क्र.१४८४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२५/११/२०२२

१) श्रीमती.वर्षाराणी दत्तात्रय कोकणे
वय : ४२ वर्षे, व्यवसाय :
२) श्री.युवराज दत्तात्रय कोकणे
वय : वर्षे, व्यवसाय : शिक्षण
३) कु.अधिराज दत्तात्रय कोकणे
वय : वर्षे, व्यवसाय : शिक्षण
सर्व रा.सदनिका क्र.३०३, सेलिब्रेशन के एच ३,
बिल्डींग नं.१४, सेक्टर १६ व १७ खारघर,
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड–४१०२०६
(अर्जदार क्र.२ व ३ हे अज्ञान असल्यामुळे
त्याची पालनकर्ती म्हणून आईची सही) अर्जदार

**सदनिकेचे वर्णन**

| शहर | सेक्टर | सदनिका क्र. | प्लॉट क्र. | किंमत |
|---|---|---|---|---|
| खारघर | सेक्टर १६ व १७ | सदनिका क्र.३०३, तिसरा मजला, बिल्डींग नं.१४, सेलिबेशन केएच ३, क्षेत्रफळ ६०९.९९० चौ.फूट | १९ | १८,६०,४७०/– |

सदरहू वरील अर्जदार क्र.१ ह्या श्री.दत्तात्रय निवृत्ती कोकणे यांच्या पत्नी आहेत व अर्जदार क्र.२ व ३ ही त्याची मुलगे आहेत. श्री.दत्तात्रय निवृत्ती कोकणे यांचे निधन दि.११/०८/२०२० रोजी पनवेल येथे झाले आहे. श्री.दत्तात्रय निवृत्ती कोकणे यांच्या निधनाची नोंद पनवेल महानगरपालिकेमध्ये केलेली आहे. पनवेल महानगरपालिकेने दिलेला मृत्यूचा दाखला अर्जासोबत जोडलेला आहे. वरील उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळविण्याकरिता अर्ज दाखल केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल आणि वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून १ महिन्याच्या आत ह्या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयताचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१८/१०/२०२२ रोजी सहीने व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/–** **क.लिपीक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**
कोर्टाचा शिक्का
**सही/–** **सहा.अधिक्षक** **दि.न्या.व.स्तर, पनवेल**


## खरवली सरपंच आणि महाआघाडीच्या पदाधिकाऱ्यांविरोधात गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । महाड**

बेकायदेशीर मिरवणूक आणि पोलीस अधिकार्यांशी अरेरावी केल्याप्रकरणी खरवली ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित सरपंच आणि महाविकास आघाडीच्या प्रमुख पदाधिकार्यांविरोधात महाड एमआयडीसी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

सोमवारी खरवली ग्रामपंचायतीची मतमोजणी झाल्यानंतर, महाविकास आघाडीच्या पदाधिकार्यांनी आणि कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित सरपंच चैतन्य म्हामुणकर यांची एमआयडीस ते काळीज अशी विजयी मिरवणूक काढली. मनाई आदेश लागू असताना, परवानगी न घेता ही मिरवणूक काढण्यात आली होती.

या मिरवणूकीत ढोल, ताशे, फटाके वाजवून घोषणाबाजी आणि वेगवेगळे झेंडे फडकावित काही कार्यकर्ते पोलीस नाईक महेश मढवी आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. आंधळे यांच्या अंगावर धावून गेले आणि त्यांना बघून घेण्याची धमकी दिली. या प्रकरणी मढवी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार चैतन्य म्हामुणकर, रवींद्र नलावडे, श्रुतिका म्हस्के, राजेंद्र कोर्पे, धनंजय देशमुख, जगदीश पवार, सोनल उतेकर, नितीन सकपाळ, बाळ्या सकपाळ, अमोल म्हस्के आणि इतर कार्यकर्त्यांविरुध्द भा. दं. वि. कलम १८८, १८६, १८९, ५०६, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक पी. पी. शास्त्री हे अधिक तपास करित आहेत.


## पनवेल महानगरपालिका, पनवेल

### उप आयुक्त तथा नियंत्रक, अतिक्रमण / अनधिकृत बांधकाम निष्कासन विभाग

### पनवेल महानगरपालिका, पनवेल

### जाहीर प्रकटन

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका १५५/२०११ मध्ये वेळोवेळी दिलेल्या आदेशात सार्वजनिक / खाजगी जागेवर, इमारतींवर लावण्यात आलेले अनधिकृत जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. वर तातडीने कारवाई करणेचे आदेश दिलेले आहेत. तरी सर्व नागरिक / संस्था / मंडळे / राजकीय पक्ष इ. सुचित करण्यात येते की, शहरामध्ये विनापरवानगी लावण्यात आलेले जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. तसेच भिंती रंगवून जाहिरात करू नयेत. तसेच झाडावर कोणत्याही प्रकारची जाहिराती लावून इजा पोहचू नये, अन्यथा संबंधितांवर सार्वजनिक मालमत्ता विद्रुपीकरण प्रतिबंध कायद्यांतर्गत फौजदारी कारवाई करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये विनापरवानगी जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. लावलेचे आढळल्यास त्याची माहिती देणेकरिता नागरिकांना नावांनिशी किंवा निनावी तक्रार नोंदविण्याकरिता पनवेल महानगरपालिकेने खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत.

**टोल फ्री क्रमांक १८००–२२७–७०१**
**ई–मेल** : panvelcorporation@gmail.com
**व्हॉटस्ॲप क्रमांक व एस.एम.एस.सुविधा** : **९७६९०१२०१२**
**दूरध्वनी क्रमांक :– ०२२–७४५८०४०/४१/४२**

नागरिकांनी आपल्या क्षेत्रात / परिसरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत होर्डिंग्ज लावलेले आढळल्यास अथवा नव्याने लावले जात असल्याचे निदर्शनास आल्यास वरील क्रमांकावर तक्रार नोंदविता येईल.

अधिक माहितीसाठी संबंधित प्रभागाचे नोडल अधिकारी तथा प्रभाग क्षेत्र अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक खालीलप्रमाणेः–

| अ.क्र. | प्रभाग अधिकाऱ्यांचे नाव | प्रभाग समिती | भ्रमणध्वनी क्रमांक | प्रभाग क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.जितेंद्र मढवी प्र.प्रभाग अधिकारी, **प्रभाग ''अ''** | प्रभाग 'अ', खारघर | मो.क्र. ९८१९९९८७८८ | आडिवली, बीड, रोहिंजण, धानसर, तुर्भे, पिसार्वे, करवले बु., तळोजे मजकूर, पेंधर, घोट, कोयनावेळे, नावडे, पडघरे, तोंडरे, पालेखुर्द, देवीचा पाडा, चाळ, नागझरी, ओवे, तळोजे पाचनंद, खारघर, बेलपाडा गाव, हिरानंदानी, रेल्वे विहार, फणसवाडी, चाफेवाडी, हैदरवाडी, बेलपाडा, कातकरवाडी, कोपरा गाव |
| २ | श्री.सदाशिव कवठे प्र.प्रभाग अधिकारी **प्रभाग ''ब''** | प्रभाग 'ब', कळंबोली | मो.क्र. ९८१९६३३१७४ | रोडपाली, कळंबोली, खिडुकपाडा, वळवली, टेंभोडे, आसुडगाव, नवीन पनवेल, से.१, ४, ५, ७ मधील काही भाग से.८, ९, १०, ११, १२ मधील काही भाग, खांदा कॉलनी काही भाग |
| ३ | श्री.अरविंद पाटील प्र.प्रभाग अधिकारी **प्रभाग ''क''** | प्रभाग 'क', कामोठे | मो.क्र. ९३२२३५१८९७ | कामोठे, कामोठे गाव, जुई गाव, कोळीवाडा, गाढी नदी परिसर, धाकटा खांदा, मोठा खांदा, पनवेल मधील काही भाग, ठाणा नाका रोड, ५२ बंगला, साईनगर |
| ४ | श्री.अमर पाटील प्र.प्रभाग अधिकारी **प्रभाग ''ड''** | प्रभाग 'ड', पनवेल | मो.क्र. ९८३३७३६९८९ | काळुंद्रे, तक्का, पनवेल, नवीन पनवेल काही भाग, पोदी से.१२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९ |

तरी नागरिकांनी आपल्या क्षेत्रात / परिसरामध्ये कोणत्याही प्रकारचे अनधिकृत बॅनर, पोस्टर्स, जाहिरात फलक लावलेचे आढळल्यास संबंधित नोडल अधिकारी तथा प्रभागक्षेत्र अधिकारी यांच्या भ्रमणध्वनी क्रमांकावर तक्रार करता येईल.

जा.क्र.पमपा/अ.बां.नि./३६२२/प्र.क्र.०३/९६/२०२२
दि.१८/१०/२०२२

**सही/–**
**(कैलास गावडे)**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपालिका**